# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि /55 /2020 दिनांक: 29 / 03 /2020

वाचा —
1. आपत्ती व्यवस्थापन कायदा — 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक 14 मार्च 2020
5. फौजदारी प्रक्रिया संहिता — 1973 चे कलम 144 अंतर्गत आदेश दिनांक 22.3.2020
6. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/कावि 98/2020 दिनांक 23.3.2020
7. गृह मंत्रालय भारत सरकार यांचे आदेश दिनांक 29.3.2020

## *आदेश*

**ज्या अर्थी**, शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड — 19 कोरोना विषाणू वर उपाययोजना नियम-2020 नुसार दिनांक 14 मार्च 2020 रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील नियम क्र. 3 नुसार कोरोना विषाणूमूळे (COVID-१९) उद्भ्वलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे. **आणि**

**ज्याअर्थी,** गृह मंत्रालय भारत सरकार यांचे आदेश दिनांक 29.3.2020 मध्ये नमुद केल्यानुसार कोविड-19 या विषाणूचा प्रार्दुभाव व फैलाव रोखण्यासाठी तसेच कोरोना विषाणूचा संसंर्गावर नियंत्रण ठेवण्यासाठी संचारबंदी लागू करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहे. आणि

**ज्याअर्थी,** अकोला जिल्हयात कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून संपूर्ण अकोला जिल्हयामध्ये फौजदारी पक्रिया संहिता 1973 चे कलम 144 चे आदेशानुसार मनाई आदेश पारीत करण्यात आले आहे.

**त्या अर्थी,** आपत्ती व्यवस्थापन कायदा- 2005 , साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 व महाराष्ट्र शासनाची दिनांक 14 मार्च 2020 चे अधिसूचनेनुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकरानुसार मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला,** देशातील काही भागामध्ये परप्रांतीयांच्या मोठया सख्येने हालचाली सुरु झालेल्या आहेत. त्यामुळे निश्चितच संचारबंदीचे उल्लंधन होत आहे. तयामुळे परप्रातीयांना जेथे आहे तेथेच थांबण्याकरिता खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

1. आयुक्त, अकोला महानगरपालिका /सर्व उपविभागीय अधिकारी / तहसिलदार यांनी आपापल्या भागातील लॉकडाऊन उपाययोजनामुळे अडकलेल्या गरीब आणि गरजू लोकांसाठी तात्पुरत्या आश्रयस्थानांची व्यवस्था करावी. तसेच त्यांचे भोजनाची एनजीओ तसेच इतर होतकरु संस्थेकडून करणे बाबत तरतुद करण्याची व्यवस्था करावी.

2. स्थलांतरित लोक, जे स्वत: च्या गृह राज्य / गावे गाठण्यासाठी निघाले आहेत, त्यांना आवश्यक त्या आरोग्यविषयक तपासण्या करुन किमान १४ दिवसांची योग्य तपासणी करून आपले क्षेत्रामधील निश्चित करण्यात आलेल्या जवळच्या निवारामध्ये ठेवणे आवश्यक आहे. जिल्हयातील संचारबंदीच्या कालावधीत बंद असलेल्या उद्योग व्यवसायीक, दुकानदार यांनी त्यांचे आस्थापनेवर नियुक्त केलेल्या कामगारांना त्यांचे मजुरीचे वेतनामध्ये कोणत्याही प्रकारचे कटोती न करता रक्कम अदा करण्यात यावी.

3. ज्याठिकाणी परप्रांतीयांसह कामगार भाड्याने दिलेल्या निवासस्थानी राहत आहेत, त्या मालमत्तांचे जमीनदार/ मालक एक महिन्याच्या कालावधीसाठी भाडे देण्याची मागणी करणार नाहीत.

..२..

4. जर कोणताही जमीनदार घरमालक हे मजूर आणि विद्यार्थ्यांना त्यांचे राहते घर रिकामे करण्यास भाग पाडत असेल तर कायदयातील तरतूदीनुसार कारवाई करण्यास ते स्वतः जबाबदार असतील.

तसेच असेही आदेशीत करण्यात येत आहे की, वरीलपैकी कोणत्याही बाबींचे उल्लंघन झाल्यास संबंधीत व्यक्ती / संथा / प्रतिष्ठाण इ. नियमानुसार कारवाईस पात्र राहील .

सदर आदेश आज दिनांक 29 मार्च 2020 रोजी माझे स्वाक्षरी व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय
सत्यमेव जयते

**(जितेंद्र पापळकर,भाप्रसे)**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**
**जिल्हादंडाधिकारी,अकोला**

प्रतिलिपी –

1. मा. आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.
   यांना माहिती करिता सादर
2. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
3. आयुक्त, अकोला महानगर पालिका अकोला
4. जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय, अकोला
5. जिल्हा आरोग्य अधिकारी, यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
6. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अकोला यांना माहीती तथा उचित कार्यवाहीस्तव.
7. उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी/ ---------------------------- सर्व.
8. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी ------------- सर्व.
9. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, विभाग, अकोला
10. पोलीस निरिक्षक-------------------------- सर्व
11. मुख्याधिकारी ------------------------------------------ मार्फत जिल्हा प्रशासन अधिकारी, अकोला, यांनी नगर परिषद / नगर पंचायत कार्यक्षेत्रामध्ये उपरोक्त आदेशाची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याचे दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी.
12. गट विकास अधिकारी, ----------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
13. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी सदर माहीतीस बातमिच्या स्वरुपात व्यापक प्रसिध्दी देण्याचे दृष्टीने विनामुल्य प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**
**जिल्हादंडाधिकारी,अकोला**